# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

## प्रकटन

**विषय :-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून प्रश्नपत्रिका दहा मिनिटे अगोदर वितरीत करण्याच्या कार्यपध्दतीबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे क्रमांक रा.मं./परीक्षा–८/७३४, दि. १०/०२/२०२३ रोजीचे प्रकटन

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणा–या परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी (आकलन होण्यासाठी) परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वाटप परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर करण्यात येत होते.

इ. १० वी व इ. १२ वी च्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वपूर्ण टप्पा असल्यामुळे पालक व समाज घटक यांचे या परीक्षांकडे बारकाईने लक्ष असते. परंतु प्रश्नपत्रिका मोबाईलवर तसेच अन्य समाज माध्यमातून व्हायरल झाल्याच्या अफवा व काही अंशी अशा घटना निदर्शनास आलेल्या आहेत.

अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध व्हावा तसेच परीक्षा निकोप, भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात सुरळीत पार पडाव्यात यासाठी परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरीत करण्याची सुविधा फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून रद्द करण्यात येत असल्याचे कळविण्यात आलेले आहे.

तथापि विद्यार्थी हित लक्षात घेवून व पालक, विद्यार्थी यांच्या मागणीचा विचार करून सदरची दहा मिनिटे परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर वाढवून देण्यात येत आहे.

फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून सकाळ सत्रात स. ११.०० वाजता तसेच दुपार सत्रात दु. ३.०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल व लेखनास प्रारंभ होईल.

सकाळ सत्रात स. १०.३० वाजता तसेच दुपार सत्रात दु. २.३० वाजता परीक्षार्थ्यांने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

उदा.:–

| | परीक्षेची सध्याची वेळ | परीक्षेची सुधारित वेळ |
|---|---|---|
| सकाळ सत्र | स. ११.०० ते दु. २.०० | स. ११.०० ते दु. २.१० |
| | स. ११.०० ते दु. १.०० | स. ११.०० ते दु. १.१० |
| | स. ११.०० ते दु. १.३० | स. ११.०० ते दु. १.४० |
| दुपार सत्र | दु. ३.०० ते सायं. ६.०० | दु. ३.०० ते सायं. ६.१० |
| | दु. ३.०० ते सायं. ५.०० | दु. ३.०० ते सायं. ५.१० |
| | दु. ३.०० ते सायं. ५.३० | दु. ३.०० ते सायं. ५.४० |

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

दिनांक – १५ फेब्रुवारी, २०२३.

---

क्र. मुंविमं/के.नि./सन २०२३/ ४४८२
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक : १७/०२/२०२३

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
परिरक्षक, केंद्रसंचालक इ.१०वी व इ,१२वी.
मुंबई विभागीय कार्यकक्षेतील सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालय.

उपरोक्त उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी.) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी.) शालान्त फेब्रुवारी/मार्च २०२३ परीक्षेपासून प्रश्नपत्रिका दहा मिनिटे अगोदर वितरीत करणेची कार्यपध्दतीबाबतचे प्रकटन विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचे निदर्शनास आणून देण्यात यावी.

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवीमुंबई-४०० ७०३.